अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

(स्वायत्त दर्जा प्राप्त)

# NOTICE

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

दि. १६/०७/२०२०

## प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

**एफ.वाय.बी.ए. / बी.कॉम. / बी.एस्सी. / बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स / बी.बी.ए. / बी.बी.ए.(सी.ए.) / बी.व्होक. (फुड प्रोसेसिंग, जर्नालिझम, डेअरी टेक्नॉलॉजी, रिटेल मॅनेजमेंट, ई.कॉमर्स)**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी प्रवेश प्रक्रिया दि. १८/०७/२०२० पासून ऑनलाइन पध्दतीने व खालील नियमांप्रमाणे सुरू होत आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील फ्लो चार्ट, माहिती पुस्तक व नोटीस काळजीपूर्वक वाचावेत. जेणेकरून प्रवेश घेण्यामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी राहणार नाही. विद्यार्थ्यांनी प्रवेश कसा घ्यावा यासाठी या नोटीस सोबतचा फ्लो चार्ट अगोदर आवश्य वाचावा नी काळजीपूर्वक ऑनलाइन फॉर्म भरावा.

**आपल्याच महाविद्यालयातून मार्च/एप्रिल २०२० मधील परीक्षेस इ. १२वी मध्ये प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी दि. १८/०७/२०२० ते दि. २२/०७/२०२० पर्यंत आपला प्रवेश निश्चित करावा. अन्यथा आपला प्रवेशावरील हक्क संपुष्टात येईल. याची नोंद घ्यावी.**

इ. १२वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी दि. १८/०७/२०२० ते दि. २२/०७/२०२० या कालावधीत महाविद्यालयाच्या www.tccollege.org या संकेतस्थळावर जाऊन आपला प्रवेश दिलेल्या मुदतीत निश्चित करावा.

### थेट प्रवेश प्रक्रिया सुरु असलेले अभ्यासक्रम

१. **एफ.वाय.बी.ए.** - इ. १२वी कला मध्ये ५० टक्केच्या पुढे गुणप्राप्त केलेल्या व प्रथम प्रयत्नामध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुदानित तुकडीमध्ये थेट प्रवेश सुरू आहे.

२. **बी.बी.ए.** - सदर कोर्सेस विनाअनुदानित तत्वावर आहेत. इ. १२वी बोर्डाच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना थेट प्रवेश मिळेल.

३. **बी.बी.ए. (कॉम्प्युटर ॲप्लीकेशन)** - सदर कोर्सेस विनाअनुदानित तत्वावर आहेत. इ. १२वी बोर्डाच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना थेट प्रवेश मिळेल.

४. **एफ.वाय.बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स** - सदर कोर्स हा विनाअनुदानित तत्वावर आहे. इ. १२वी सायन्सने बोर्डाच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना थेट ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेने प्रवेश मिळेल. (यासाठी १२वी सायन्समध्ये मॅथ्स् विषय असणे आवश्यक आहे)

५. **जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन / रिटेल मॅनेजमेंट / ई-कॉमर्स ॲण्ड डिजिटल मार्केटिंग (बी.व्होक.)** - इ. १२वी मध्ये ५० टक्केच्या पुढे गुणप्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रथम येणाऱ्यास प्रथम याप्रमाणे प्रवेश दिला जाईल.

**प्रतिक्षा यादी ने प्रवेश प्रक्रिया सुरु असलेले अभ्यासक्रम**

**एफ.वाय.बी.एस्सी. / एफ.वाय.बी.कॉम. / फुड प्रोसेसिंग व हार्वेस्ट टेक्नॉलॉजी / डेअरी टेक्नॉलॉजी (बी.व्होक.)**

या वर्षी प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या संकेत स्थळावरुन ऑनलाईन माहिती पत्रक डाऊनलोड करावे व महाविद्यालयाच्या www.tccollege.org या संकेत स्थळावर प्रतिक्षा यादीसाठी अर्ज भरावा. **सदर प्रतिक्षा यादीचे ऑनलाईन फॉर्म दि. १८/०७/२०२० ते दि. २२/०७/२०२० रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत भरावेत.** प्रतिक्षा अर्जाचा नंबर स्वत:जवळ लिहून ठेवावा. सदर नंबरचा उपयोग प्रवेश घेतेवेळी अर्ज डाऊनलोड करताना लागणार आहे. विद्यार्थ्यांनी प्रतिक्षा अर्जाची प्रिंट **महाविद्यालयात जमा करु नये. दि. २३/०७/२०२० रोजी प्रवेशप्राप्त विद्यार्थ्यांची यादी जात संवर्गाप्रमाणे वेबसाईटवर प्रसिध्द केली जाईल.** या यादीमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी **दि. २७/०७/२०२० पर्यंत प्रवेशाची सर्व प्रक्रिया पूर्ण करुन व ऑनलाईन फी भरुन आपला प्रवेश निश्चित करावा.** या काळात प्रवेश न घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशावरील आपला हक्क संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.

प्रवेश फी भरुन प्रवेश निश्चित झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज डाऊनलोड करावा. हया डाऊनलोड फॉर्म सोबत इ. १२वीची गुणपत्रिका, एल.सी., जातीचा दाखला, फी भरल्याचे चलन, आधारकार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक झेरॉक्स, डोमासाईल इ. कागदपत्रे स्कॅन करुन महाविद्यालयाच्या tcc.admission20@gmail.com ईमेल आयडीवर पाठवावेत. जे विद्यार्थी सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई. बोर्डातून इ. १२वी पास झालेले आहेत अशांनी मायग्रेशन सर्टीफिकेट व इतर आवश्यक कागदपत्रे स्कॅन करुन tcc.admission20@gmail.com या मेल आयडीवर पाठवावेत. पुढे प्रत्यक्ष कॉलेज सुरु झाल्यानंतर अपलोड केलेल्या प्रवेश अर्जासोबतची सर्व कागदपत्रे प्रशासन भवन येथे जमा करावेत.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी बी.बी.ए./ बी.बी.ए.(सी.ए.) /बी.एस्सी. /बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स /बी.व्होकचे सर्व अभ्यासक्रमांची फी या वर्षी कोविड-१९ च्या असाधारण परिस्थितीमध्येफी दोन टप्प्यात सवलतीत भरण्यासाठी दोन इन्स्टॉलमेंटस् करुन दिलेली आहेत त्यानुसार प्रवेश घेताना फीचा पहिला सवलतीचा हप्ता भरावा व उर्वरित ५० टक्के फी पुढील दोन महिन्यात भरावी.

**- प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -**

१. इ. १२वी शाळा सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या ऑनलाईन किंवा २ झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे.
२. इ. १२वीचे गुणपत्रकाची झेरॉक्स प्रत.
३. ई.बी.सी./जात संवर्गाची फी सवलत घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी वेबसाईटवर शासनाने दिलेल्या मुदतीत ऑनलाईन फॉर्म भरणे आवश्यक आहे. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
४. पी.टी.एफ./एस.टी.एफ. फी सवलतीचा संपूर्ण भरलेले सही शिक्क्या निशी अर्ज प्रवेशाच्या वेळी देणे आवश्यक आहे. (फक्त अनुदानित वर्गासाठी)
५. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.
६. विद्यार्थ्यांचे आधार कार्डची झेरॉक्स.
७. अलिकडच्या काळात काढलेला आयडेंटीटी कार्ड साईजचे २ फोटो.

**सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याच्या दाखल्याच्या १० झेरॉक्स प्रती काढून ठेवाव्यात ऑनलाईन प्रवेश घेत असताना प्रवेश अर्जावर स्वत:च्या ई-मेल आय.डी. व मोबाईल नंबर लिहिणे अनिवार्य आहे.**

प्रबंधक

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य